# प्रकरण ४ भारतीय स्थलसेना




भारतीय स्थलसेना हा तीनही सेनादलांत सर्वाधिक प्राचीन सेनाविभाग आहे. सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या काळापासून म्हणजे दोन हजार वर्षांचा अत्यंत प्राचीन व उच्चतम वारसा भारतीय स्थलसेनेचा आहे. सध्याच्या भारतीय स्थलसेनेचा पाया इंग्रजांच्या काळात घातला गेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व केले होते. तसेच महिलांनासुद्धा त्यांनी आपल्या सैन्यात सहभागी करून घेतले होते. कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन या महिला तुकडीच्या प्रमुख होत्या.

## भारतीय स्थलसेनेची भूमिका


परकीय आक्रमणापासून आणि अंतर्गत कलहापासून राष्ट्रहित जोपासणे ही स्थलसेनेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ही भूमिका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी व पुढील कार्यवाहीसाठी स्थलसेनेला तत्पर रहावे लागते.

- परकीय आक्रमण मोडून काढण्यासाठी युद्ध करणे आणि नेहमी दक्ष राहणे.
- देशात निर्माण झालेले अंतर्गत धोके मोडून काढण्यासाठी अंतर्गत सुरक्षा व्यवस्थापन सक्षम करणे.
- राष्ट्रहित जोपासण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे लागेल तेव्हा लष्करी बळाचा वापर करणे.
- मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या परकीय देशांना तसेच युनोच्या शांततापूर्ण कार्यवाहीला सहकार्य करणे.
- मानवी आणि नैसर्गिक आपत्तीकाळात सहकार्य करणे तसेच नागरी अधिकाऱ्यांना मदत देणे इत्यादी.



## सेनेतील भौगोलिक विभाग आणि नियंत्रण

देशाचा भौगोलिक आकार व विस्तार आणि सुरक्षेच्या संभाव्य धोक्यांच्या आधारे भारतीय सैन्याची सहा कार्यात्मक विभागांत (कमांड) विभागणी केली आहे. हे विभाग देशात विखुरले आहेत. या विभागाची २ ते ३ सेनाभागात (कोअर) विभागणी असते. या सेनाभागांची पुन्हा आणखी २ ते ३ सैनिकी डिव्हीजनमध्ये रचना केलेली असते. या सैनिकी डिव्हीजनची विभागणी ४ ते ५ ब्रिगेडमध्ये केली जाते. प्रत्येक ब्रिगेडमध्ये ३ ते ४ बटालियन्स किंवा रेजिमेंटस् असतात. बटालियनची विभागणी पुन्हा कंपनी, प्लाटून्स् आणि सेक्शन्समध्ये होते आणि एका सेक्शनमध्ये १० सैनिक असून हा सैन्याचा सर्वात लहान व स्वयंपूर्ण लढाऊ गट असतो.



## भारतीय सैन्याचे कार्यात्मक विभाग :

### १) उत्तर विभाग (नॉर्दन कमांड):

उधमपूर येथे या विभागाचे मुख्यालय आहे. पूर्वेकडे चीन तर पश्चिमेकडे पाकिस्तान या राष्ट्रांपासून सुरक्षा ही उत्तर विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. जम्मू-काश्मीरचा प्रदेश या विभागाचे कार्यक्षेत्र आहे.

### २) पश्चिम विभाग (वेस्टर्न कमांड):

चंदीगड येथे या विभागाचे मुख्यालय असून पंजाब, पूर्वेकडे हिमाचल प्रदेश हे याचे कार्यक्षेत्र आहे. पश्चिमेकडे पाकिस्तानपासून तर पूर्वेकडे चीनपासून सुरक्षा हे यांचे कार्य आहे.

### ३) दक्षिण-पश्चिम विभाग (साऊथ वेस्टर्न कमांड):

जयपूर येथे या विभागाचे मुख्यालय आहे. उत्तर आणि मध्य राजस्थान व हरियाणा हे या विभागाचे कार्यक्षेत्र आहे.

### ४) दक्षिण-विभाग (सदर्न कमांड):

पुणे येथे या विभागाचे मुख्यालय आहे. दक्षिण राजस्थान आणि गुजरात तसेच महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, तेलंगणा व आंध्र प्रदेश हे दक्षिण विभागाचे कार्यक्षेत्र आहे.

### ५) मध्य विभाग (सेंट्रल कमांड):

लखनौ येथे या विभागाचे मुख्यालय आहे. उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा, झारखंड व छत्तीसगड हे या विभागाचे कार्यक्षेत्र आहे. उत्तराखंडमध्ये चीन तर उत्तरप्रदेश व बिहारमध्ये भारत-नेपाळ सीमेची सुरक्षा ही मध्य विभागाची जबाबदारी आहे.

### ६) पूर्व विभाग (ईस्टर्न कमांड):

कोलकाता येथे या विभागाचे मुख्यालय आहे. सिक्कीम, भूतान, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा आणि मिझोराम या क्षेत्राची सुरक्षा ही पूर्व विभागाची जबाबदारी आहे. तसेच भारत-नेपाळ सीमा, म्यानमार आणि बांग्लादेश सरहद्दींची जबाबदारीही याच विभागाची आहे.

### (७) प्रशिक्षण विभाग :

भारतीय सैन्याच्या सहा कार्यात्मक विभागांव्यतिरिक्त एक स्वतंत्र प्रशिक्षण विभाग असून स्थलसेनेचे प्रशिक्षण ही त्यांची मुख्य जबाबदारी आहे.

## स्थलसेनेची संघटना आणि रचना

प्रामुख्याने लढाऊ विभाग आणि पूरक सेवा विभाग अशा दोन प्रकारांत स्थलसेनेच्या विविध विभागांची संघटनात्मक विभागणी असते.

### अ) लढाऊ आणि लढाऊपूरक गट :

यात रणांगणावर शत्रूंशी प्रत्यक्ष लढणाऱ्या लष्करी गटांचा समावेश होतो. ते पुढीलप्रमाणे –


चिलखती दल


तोफखाना


अभियांत्रिकी गट


पायदळ


संपर्क गट


स्थलसेनेचा हवाई संरक्षक गट



स्थलसेना हवाई गट


स्थलसेनेचा शत्रूविषयक ज्ञान विभाग

## आ) पूरकसेवा गट :



स्थलसेना पुरवठा विभाग (ASC)
अन्नधान्य, दळणवळण व पेट्रोलियम पदार्थ



स्थलसेना युद्धसामुग्री विभाग (AOC)
दारूगोळा, शस्त्रास्त्रे, वाहतूक साधने,
कापड व इतर साहित्य



इलेक्ट्रॉनिक्स् आणि तंत्र अभियांत्रिकी विभाग (EME)
शस्त्रास्त्र आणि साहित्य दुरुस्ती व देखभाल




वैद्यकीय सेवा व उपचार (AMC)
स्थलसेनेचा वैद्यकीय विभाग




दंतचिकित्सा व उपचार (ADC)
स्थलसेनेचा दंतचिकित्सा विभाग



मनुष्यबळ विकास (AEC)
स्थलसेनेचा शैक्षणिक विभाग




पशुवैद्यकीय विभाग (RVC)
घोडे, श्वान, खेचरे इत्यादी




लष्करी पोलीस (MP)
वाहतूक नियंत्रण व शिस्त




कायदा विभाग (JAG)



पायोनिअर (PIONEER)
युद्धक्षेत्रात आघाडी व पिछाडीवर
कार्यरत लष्करी कामगार

## उपक्रम

१. स्थलसेनेतील लढाऊ गटांच्या योग्य जोड्या लावा. (छायाचित्राआधारे)

पायदळ ◯

तोफखाना ◯

अभियांत्रिकी विभाग ◯

स्थलसेना हवाई संरक्षक गट ◯

चिलखती दल ◯

संपर्क विभाग ◯

A


B


C


D


E


F


२. स्थलसेनेचा रचनात्मक आराखडा (Ranks) तक्ता तयार करून वर्गात दर्शनी भागात लावा.

7HRM31